Impact Factor-7.675 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refereed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

October-2021

ISSUE No- (CCCXXII) 322

## २१व्या शतकातील कोरोना महामारीच्या काळात सध्यस्थितीत निर्माण झालेल्या समकालीन सामाजिक समस्या




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. D. B. Tanduljekar
I/C Principal
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

**Editor**
Dr. Sanjay Surewad
Head, Department of Sociology ,
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

| | | |
|---|---|---|
| 42 | ग्रामीण कथेतून चित्रित होणाऱ्या ग्रामीण समस्या **प्रा. दिलीप ज्ञानोबा भिसे** | 145 |
| 43 | दहशदवाद' एक सामाजिक समस्या **प्रा.डॉ. बडुरे राजू सायन्ना** | 148 |
| 44 | भारतातील सार्वजनिक आरोग्य **प्रा. मनीषा महारुद्र गाडवे** | 151 |
| 45 | जातीव्यवस्था - एक सामाजिक समस्या **प्रा.डॉ.राजाभाऊ बंकटराव भगत** | 153 |
| 46 | मराठवाड्यातील ग्रामीण कथा साहित्यातील शेतकरी समस्या **श्री. काजगुंडे हनुमंत महादेव** | 155 |
| 47 | हवामान बदलाचा परिणाम **प्रा. कांबळे दिलीप बबनराव** | 157 |
| 48 | हुंडा प्रथा: एक सामाजिक कलंक **प्रा. डॉ. सुनिता आ टेंगसे** | 160 |
| 49 | अण्णा हजारे यांचे राळेगसिध्दीतील सामाजिक परिवर्तनाच्या कार्याचा अभ्यास **डॉ. मिलिंद बळीरामजी भगत/सावधान वासुदेव उमक** | 163 |
| 50 | आत्महत्या : सद्यकालीन एक गंभीर समस्या याचे वास्तव्य आणि सर्वांगीण दृष्टीकोनातून अभ्यास **डॉ.सुनंदा ए नाथराव आहेर** | 169 |
| 51 | स्त्री - भ्रूणहत्या एक सामाजिक समस्या **प्रा. उगीले माधव उत्तमराव** | 175 |
| 52 | कोरोना संसर्गाचा समाजावर झालेल्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास **प्रा. गंगाधर चव्हाण** | 179 |
| 53 | दहशतवाद - राष्ट्रीय सुरक्षेसमोरील - एक सामाजिक समस्या **प्रा.डॉ.प्रशांत प्रभाकरराव सराफ** | 182 |
| 54 | हवामान बदलाचे भारतीय कृषि क्षेत्रावरील परिणाम **प्रा.डॉ. कदम मोतीराम विठ्ठलराव** | 186 |
| 55 | भ्रष्ट्राचार : एक ज्वलंत सामाजिक समस्या **परमेश्वर ज्ञानोबा रूपनर** | 190 |
| 56 | वाढता दहशतवाद : एक जागतिक समस्या **प्रा. डॉ. माधव माणिकराव मोरे** | 192 |
| 57 | जनतेचा राजा छत्रपती शाहू **डॉ.मोरे एम.एम.** | 195 |
| 58 | कोरोना काळातील आरोग्य व्यवस्थापन **Dr. Madhukar Vithoba Jadhav** | 198 |
| 59 | स्त्री हिंसाचार आणि भारतीय कायदे **श्रीकांत दिनकर तांदळे** | 201 |
| 60 | ई-साहित्य आणि त्याची ग्रंथालयातील उपयोगिता श्री.वाकडे पुरुषोत्तम बाबासाहेब | 204 |
| 61 | ज्ञानाधिष्टीत समाज आणि ग्रंथालयाची भूमिका **श्री.एस.टी.भोसले** | 206 |
| 62 | यशवंतराव चव्हाण एक बहुआयामी व्यक्तिमत्व **श्री किशोर बाबुराव भगत** | 208 |
| 63 | मानवी आरोग्य पाणी नैसर्गिक पर्यावरण **डॉ संतोष बाबुराव कोकीळ** | 210 |
| 64 | स्त्रियांच्या श्रमाचे अर्थव्यवस्थेतील शोषण **Dr. Pragati Harle Kukade** | 213 |


Late. Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO322 (CC CCCXXII)
ISSN : 2278-9308
October, 2021

# हुंडा प्रथा: एक सामाजिक कलंक

प्रा. डॉ. सुनिता आ टेंगसे
कै रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ जि. परभणी

**प्रस्तावना:**

सामाजिक समस्या या मानवी समाजाइतकाच प्राचीन आहेत मानवी समाजात पविवीध कालखंडात सामाजिक समस्या होत्या.एकोणिसाव्या शतकात सतीप्रथा बालविवाह केशवपन जातिप्रथा अस्पृश्यता विधवाविवाह यासारख्या अनेक ज्वलंत प्रश्न समाजात होते विसाव्या शतकाच्या सुरुवातीला यातील काही प्रश्न व त्यांची तीव्रता कमी झाली असली तरीही आजही अनेक प्रश्न प्रकर्षाने जाणवत आहेत सती प्रथा बालविवाह केशवपन हे सामाजिक प्रश्न होते असे म्हटल्यावर बऱ्याच जणांना पटणार नाही नाही एवढ्या मोठ्या प्रमाणात समाजात बदल झालेला आहे परंतु त्याबरोबरच समाजात नवीन प्रश्न उद्भवले आहेत उद्भवलेल्या या सामाजिक समस्यांमध्ये बेकारी आवृत्ती हुंडा प्रथा घटस्पोट प्रदूषण कौटुंबिक कौटुंबिक अत्याचार , आतंकवाद जातिवाद समस्या यासारखे अनेक प्रश्न आज भारतीय समाजाला भेडसावत आहेत. विविध सामाजिक समस्या मानवी जीवनामध्ये अवरोध निर्माण करतात सामाजिक समस्या समाजातील बहुतांश लोकांच्या हितामध्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या बाधा निर्माण करत असतात लोकांच्या आशाआकांक्षा पूर्ती मध्ये अडथळे निर्माण करतात म्हणून सामाजिक समस्या संबंधित व्यक्तींच्या मनामध्ये चिंता निर्माण होतात आणि या सामाजिक समस्या सोडवण्यासाठी विविध स्तरावर कार्य करण्याची आवश्यकता असते.सामाजिक समस्या सार्वत्रिक असल्या तरी प्रत्येक समाजात समस्यांचे स्वरूप सारखे नसते या सामाजिक समस्यांच्या स्वरूपात स्थल आणि काल मान परत्वे भेद दिसून येतो भारतात असणारे हुंड्याची समस्या गंभीर स्वरूप धारण करत आहे परंतु हीच समस्या इतर पाश्चात्य देशातील नागरिकांना प्रभावित करतेच असे नाही.

**शोधनिबंधाचे उद्देश:**

१.हुंडा म्हणजे काय ते जाणून घेणे.

२. हुंडा पद्धती ची कारणे कोणती आहेत हे अवगत करणे.

३. हुंडा पद्धतीचे भारतीय समाजावर परिणाम अभ्यासणे.

४. हुंडा प्रतीवर प्रतिबंध घालण्यासाठी उपाय सुचवणे.

**गृहीत कृत्य:**

भारतात आजही ग्रामीण शहरी शिक्षित अशिक्षित कुटुंबात हुंडा दिला व घेतला जातो.

**तथ्य संकलन:**

संशोधन निबंधाच्या मांडणीसाठी दुय्यम तथ्य संकलन साधनांचा अवलंब करण्यात आलेला आहे.यात वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके, संदर्भ ग्रंथ व इंटरनेट यांच्या मदतीने विचारांची मांडणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

विवाहाच्या वेळेस मौल्यवान वस्तू किंवा ठरलेली नगद रोख रक्कम प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष स्वरूपात वधुपक्षाकडून वरपक्षास दिली जाते, त्याला रूढ अर्थाने हुंडा असे म्हणतात. भारतामध्ये प्राचीन काळापासूनच हुंडा पद्धत अस्तित्वात आहे. आपल्या समाजात जात, धर्म यांनुसार खूप वेगवेगळया रूढी-परंपरा आहेत. त्यांनुसार हुंडा घेण्याच्या पद्धतीही वेगवेगळ्या आहेत. पूर्वी ही पद्धत फक्त राजे-महाराजे अशा श्रीमंत लोकांपुरतीच मर्यादित होती; परंतु आज ही पद्धती समाजातील सर्वच स्तरांमध्ये रूढ झालेली आहे. भारतातील पुरुषप्रधान व्यवस्थेचे एक महत्त्वाचे प्रारूप म्हणजे हुंडा पद्धत होय.

हुंडा या प्रथेबद्दल अनेक सामाजिक संस्था, संघटना यांच्याकडून अभ्यास करण्यात आले आहेत. त्यांपैकी 'नॅशनल कमिटी फॉर विमेन' या समितीद्वारा केलेल्या अभ्यासात (१) धार्मिक रूढी, परंपरा, (२) सामाजिक गरज, (३) वधू-वराला भेट देणे, (४) आर्थिक संकटात वधूला आर्थिक संरक्षण देणे, (५) वधुला मृत्युपूर्वीच माहेरकडून

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO322 (CC CCCXXII)
ISSN : 2278-9308
October, 2021

मिळालेली वारसा रक्कम, (६) संसारात मदत म्हणून रोख देणे, (७) वधुला सासरी त्रास होऊ नये म्हणून रक्कम देणे, (८) वधू आणि वर यांच्या कुटुंबातील तफावत भरून काढण्यासाठी इत्यादी "हुंडा घेण्याचे कारणे" आढळून आलेत.

हुंडा पद्धत या समस्येची व्याप्ती आणि बदलते स्वरूप समजून घेण्यासाठी आपल्या दैनंदिन जीवनात, सामाजिक संबंधात या हुंडाप्रथेमुळे काय घडामोडी होत आहेत, तसेच देशाच्या आर्थिक, राजकीय व्यवहारांशी हुंडा प्रथेचा नेमका काय संबंध आहे हे समजून घेतल्याशिवाय 'हुंडा' या शब्दामागचा व्यवहार व परिणाम समजणार नाही. आपल्या समाजात आज विषमता व असमानता अधिकाधिक तीव्र होत आहेत. शोषण आणि अन्यायही वाढत आहेत. हुंडा प्रथेत आपल्याला याचेच छोटेखानी, प्रातिनिधिक स्वरूप पाहायला मिळते. आज समाजात लिंगभेद, वर्ग व जातीमुळे सुरू असलेले शोषण हुंडा पद्धतीत प्रतिबिंबित होताना दिसते. त्याचबरोबर जागतिकीकरण व उदारीकरण यांमुळे फोफावलेला चंगळवाददेखील हुंडाप्रथेत बेमालूमपणे मिसळलेला दिसतो. अशाप्रकारे हुंडाप्रथेला एक प्रकारे नवसंजीवनीच मिळत आहे.

आज भारतीय समाजामध्ये हुंडा पद्धत इतकी रूढ व गंभीर झाली आहे की, या पद्धतीमुळे अनेक समाजातील गरीब मुली आत्महत्या करताना दिसून येतात. त्याचबरोबर मुलगी जन्मास आली की, तीच्या लग्नाला मोठा खर्च येतो, या विकृत विचारामुळे समाजामध्ये स्त्रीभृण हत्या, मुलीचा खून करणे अशा प्रकारच्या घटना घडत आहेत. महाराष्ट्र राज्यात दर २२ तासाला एक हुंडा बळीची घटना घडते. दर १६ तासांनी हुंड्याशी संबंधित एक गुन्हा घडतो.

**हुंडा प्रतिबंधक कायदा :** भारत सरकारने १९६१ मध्ये" सर्वप्रथम हुंडा प्रतिबंधक कायदा देशामध्ये लागू केला. या कायद्यामध्ये 'विवाहापूर्वी, विवाहाच्या वेळी किंवा विवाहानंतर एका पक्षाने दुसऱ्या पक्षाला अथवा कोणत्याही पक्षाच्या माता–पित्यांनी वा इतर कोणत्याही नातेदारांनी अन्य पक्षाला वा इतर कोणा व्यक्तीला दिलेली वा देण्याचे मान्य केलेली संपत्ती वा अन्य मौल्यवान वस्तू म्हणजे हुंडा होय' अशी व्याख्या करण्यात आली. व्याख्येमध्ये हुंडा देणे व वधुमूल्य देणे या दोहोंचाही समावेश करण्यात आला आहे; पण विवाहाच्या वेळी देण्यात येणाऱ्या लहान मोठ्या रकमा वा इतर भेटवस्तू यांचा समावेश या कायद्यामध्ये करण्यात आला नाही. त्यामुळे यावर बऱ्याच प्रमाणात चिकित्सासुद्धा करण्यात आली.

**हुंडा प्रतिबंधासाठी उपाय :**

१. हुंडा देण्यात मदत करणाऱ्यांस जास्तीत जास्या कायद्यान्वये होणारे गुन्हे हे दखलपात्र नसल्यामुळे आरोपी जामिनावर सुटू शकतो. त्यामुळे या कायद्याखाली होणारे गुन्हे दखलपात्र समजण्यात यावे व शिक्षासुद्धा कडक आणि कठोर करावी.

२. या कायद्यातील कलम ७ 'सी' अन्वये गुन्हा घडल्यापासून एक वर्षाच्या आत त्याबद्दल तक्रार येणे अपेक्षित आहे. तक्रारीसाठी दिलेली ही मुदत रद्द करण्यात यावी.

३. विवाह नोंदणी अनिवार्य करण्यात यावे.

४. आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यात यावे, तसेच हुंडा न घेता साधेपणाने विवाह करणाऱ्यास प्रोत्साहनपर बक्षिसे ठेवावी.

५. हुंडा घेणाऱ्या व विवाहाच्या वेळी प्रचंड पैसा खर्च करणाऱ्या व्यक्तींवर सामाजिक बहिष्कार टाकण्यात यावा.

६. विवाहातील कन्यादान या संकल्पनेवरच बंदी घातली पाहिजे.

**समारोप:**

आजही हुंडा प्रथा ही एक सामाजिक कलंक आहे. हुंडा प्रतिबंधक कायदा अस्तित्वात असूनही देशात त्यामुळे लाखो लेकीबाळी आपले प्राण गमावत आहे तर प्रत्येक मुला व महिलांचे आयुष्य यामुळे उद्ध्वस्त होत आहे. समाजातील काही संघटना कडून हुंडाविरोधी चळवळीं राबविण्यात येत आहेत परंतु या चळवळीचा हवि तसा प्रभाव पडत नाही, त्यामुळे आजही देशात वेगवेगळ्या भागात हुंडा देऊन घेऊन लग्न केले जात आहेत. जे श्रीमंत आहेत ते हुंडा देतात पण एखाद्या गरीब कुटुंबात हुंडा देण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नसतात त्यामुळे त्यांच्या मुलीचे लग्न होत नाही. अशा प्रसंगी मुली स्वतःला आई-वडीलां वरील आपन ओझे आहेत असे मानून आपली जीवनयात्रा

संपवत असलेली अनेक उदाहरणे वर्तमानपत्रातून वाचनात येत आहेत. या हुंड्याच्या काळजी मुळेच काही कुटुंबातून मुली नकोशा होत आहे त्यामुळे बेटी बचाव आंदोलन करावे लागत आहे .हे आंदोलन करणाऱ्यांनी सर्वात प्रथम हुंडाविरोधी कायदा हे अभियान राबवणे गरजेचे आहे .भारतीय संविधानात पुरुष आणि महिलांना समान अधिकार दिले आहेत.आज महिलांनी विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतलेली आहे असे असतानाही हजारो नवविवाहित महिलांना हुंड्यापायी जाळले जात आहे किंवा अन्य मार्गाने त्यांची हत्या केली जात आहे ही बाब आपल्या समाजाला मोठे आव्हान देणारी आहे. महिलांवरील अत्याचाराच्या घटना घडत आहेत अशा घटना घडू नये म्हणून सरकारने केवळ कायदे करून चालणार नाही तर त्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणा प्रबळ असली पाहिजे. वेळेत हुंडा दिला नाही म्हणून आणि लग्नाच्या वेळी वर पित्याकडून लग्नमंडपात मागणी केली जाते अशा प्रसंगी अनेक मुलींनी मी अशा मुलांशी लग्न करणार नाही अशी भूमिका घेतल्याची उदाहरणेही कमी नाहीत.परंतूह सर्वच मुली असे धाडस दाखवत नाही त्यामुळे भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी सहुंडा प्रतिबंधक कायदा अधिक कडक करायला हवा. या कायद्यान्वये याच्यावर गुन्हा दाखल होईल त्याला खटला संपेपर्यंत जामीन मिळता कामा नये.अशा गुन्ह्यात जन्मठेपेच्या शिक्षा पेक्षा कमी शिक्षा असता कामा नये,हुंडा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल झाल्यास अशा कुटुंबावर सामाजिक बहिष्कार टाकायला हवा. अशा वरपीत्याच्या संपत्तीवर पायबंद घालण्यासाठी कठोर कार्यवाही होने गरजेचे आहे . याबरोबरच आजचा तरुण सुशिक्षित आहे त्याला सामाजिक जबाबदारीची जाण असणे आवश्यक आहे. त्यामुळे कुटुंबीयांनी जरी हुंड्याचा आग्रह धरला तरी त्या तरुणांनी स्वतः विरोध करायला हवा.मुलांनी मी हुंडा घेणार नाही आणि मुलींनी मी हुंडा घेणाऱ्या मुलांशी मी विवाहबद्ध होणार नाही असा प्रण केला तर या कुप्रथेला निश्चितच आळा बसू शकेल असे मला वाटते.

**संदर्भ सूची:**

1. डॉ. भा.कि.खडसे भारतातील सामाजिक समस्या, मंगेश प्रकाशन नागपूर 2009 पान.1
2. हुंडा पद्धती ,गजेंद्र कडव, मराठी विश्वकोश 7 एप्रिल 2021
3. हुंडा थांबवण्याची जबाबदारी तरुण वर्गाची दैनिक सामना 6 ऑक्टोबर 2017
4. https//directorate.marathi.gov.in

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani